घड्याळ म्हंटल की..
विठ्ठल वॉच
नामवंत कंपन्यांची घड्याळे
मिळतील विक्री व दुरूस्ती
सुधाकर कॉम्पलेक्स,नगरपलिकेसमोर
मायणी रोड,विटा (जि.सांगली)
८२६२८३५३९१-९४२१२२१६३०

# प्रीतिसंगम

www.pritisangam.com
सातारा-सांगली-कोल्हापूर-पुणे-सोलापूर

छोटी जाहिरात मोठा प्रतिसाद
दैनिक प्रीतिसंगममध्ये छोट्या जाहिराती प्रसिद्धीसाठी देवून सहकार्य करा..
संपर्क
कराड-२२७७२५/७३५०६४२३९४
सातारा कार्यालय-९२२६३९८८१७

वर्ष २९ वे | अंक ३८२ | पाने ४ | बुधवार | दि. १५ एप्रिल २०२६ | किंमत २ रूपये | R.N.I.No.MAHMAR./2001/10338 पोस्ट परवाना No./KRDDN/008/2024-2026 | फोन-२२७७२५

# होर्मुझवरुन तणाव वाढला

## पंतप्रधान मोदी आणि डोनाल्ड ट्रम्प यांच्यात ४० मिनिटे चर्चा

**नवी दिल्ली/वृत्तसंसथा:-**

इस्लामाबादमधील इराण आणि अमेरिका यांच्यातील चर्चा फिस्कटल्यानंतर आखाती देशांमध्ये तणाव वाढला आहे. अमेरिकेने थेट इराणच्या बंदरांचीच नाकेबंदी सुरू केली. तर आता इराणही आक्रमक पवित्र्यात आहे. अशातच पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्यात चर्चा झाली. ४० मिनिटे दोन्ही नेत्यांनी युद्ध परिस्थितीवर चर्चा केल्याची माहिती सूत्रांनी दिली.

इराण आणि अमेरिकेमध्ये शस्त्रसंधी झाल्यानंतर अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्यासोबत पंतप्रधान मोदी यांची पहिलीच चर्चा झाली. अमेरिकेने होर्मुझ सामुद्रधुनीची पूर्णपणे नाकेबंदी करण्याची घोषणा केल्यानंतर



ही घडामोड घडली आहे.

अमेरिकेचे भारतातील राजदूत सर्जिओ गोर यांनी सांगितले की, अध्यक्ष ट्रम्प पंतप्रधान मोदींना म्हणाले की, भारत अमेरिकेचा प्रिय मित्र आहे. द्विपक्षीय सहकार्यावर वाढवण्यावर दोन्ही नेत्यांनी भर दिला. त्याचबरोबर पश्चिम आशियामध्ये जी परिस्थिती उद्भवली आहे, त्यावरही चर्चा झाली. होर्मुझ सामुद्रधुनी खुली असावी आणि त्यातून जहाजांना सुरक्षितपणे वाहतूक करता यायला हवी, या मुद्द्यावर मोदींनी भर दिला.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनीही याबद्दल 'एक्स'वर माहिती दिली. मोदी म्हणाले, माझे मित्र राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांचा मला कॉल आला होता. आम्ही दोन्ही देशांच्या सहकार्याने सुरू असलेल्या विविध क्षेत्रातील कामांचा आढावा घेतला. आम्ही सर्व क्षेत्रांमध्ये व्यापक जागतिक सहकार्य वाढवण्यावर जोर दिला. आम्ही पश्चिम आशियामधील परिस्थितीवरही चर्चा केली आणि होर्मुझ सामुद्रधुनी खुली आणि सुरक्षित असायला हवी, यावर जोर दिला.



भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करण्यासाठी चैत्यभूमीवर जनसागर उसळला होता तर राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही येथे येवून अभिवादन केले. यावेळी राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, राज्यपाल जिष्णू देव वर्मा, प्रकाश आंबेडकर, आशीष शेलार व संजय शिरसाट व इतर मान्यवर.

# मराठी बोलून-वाचून दाखवा अन्यथा लायसन्स रद्द

## १ मेपासून अंमलबजावणी,राज्य सरकारचा आदेश

**मुंबई/प्रतिनिधी:-**

आगामी १ मे महाराष्ट्र दिनापासून परवानाधारक रिक्षा व टॅक्सी चालकांना मराठी भाषा येणे अनिवार्य करण्यात येणार आहे. याबाबत मोटार परिवहन विभागाच्या ५९ प्रादेशिक व उपप्रादेशिक कार्यालयांमार्फत परवाना तपासणी मोहीम राबविण्यात येणार असून संबंधित चालकांना मराठी लिहिता व वाचता येते का, याची पडताळणी केली जाणार आहे. मराठी भाषेचे ज्ञान नसलेल्या चालकांचे परवाने रद्द करण्यात येतील, असा इशारा परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिला आहे.



प्रताप सरनाईक म्हणाले की, मोटार परिवहन विभागामार्फत रिक्षा किंवा टॅक्सी चालकांना परवाना देताना स्थानिक भाषेचे, म्हणजेच मराठी भाषेचे ज्ञान असणे हा नियम आधीपासूनच लागू आहे. मात्र, मुंबई महानगर क्षेत्र, छत्रपती संभाजीनगर, नागपूर यांसारख्या शहरांमध्ये अनेक परवानाधारक चालकांना प्रवाशांशी मराठीत संवाद साधता येत नाही, तसेच काही चालक मराठी बोलण्यास टाळाटाळ करतात, अशा तक्रारी मोठ्या प्रमाणात प्राप्त झाल्या आहेत.

ज्या प्रदेशात आपण राहतो त्या प्रदेशाची भाषा व्यवसायासाठी शिकणे हे प्रत्येकाचे कर्तव्य आहे. आपल्या मातृभाषेचा अभिमान असणे जितके आवश्यक आहे, तितकेच इतर राज्यात व्यवसाय करताना त्या राज्याच्या भाषेचा आदर करणेही महत्त्वाचे आहे. म्हणूनच १ मेपासून सर्व परवानाधारक रिक्षा व टॅक्सी चालकांना मराठी भाषा लिहिता व वाचता येणे बंधनकारक राहील. नियमांचे पालन न करणाऱ्या चालकांचे परवाने रद्द करण्यात येतील.

# विट्यात पत्नीचा निर्घृण खून करून पती फरार

## डोक्यात रॉड मारून हल्ला,तालुक्यात दोन दिवसात दोन खून

**विटा/प्रतिनिधी:-**

सांगली जिल्ह्यातील खानापूर तालुक्यातील विटा शहरातील विटा येथे माळ वस्तीवर असलेल्या सुतारकीत एकाने पत्नीच्या डोक्यात लोखंडी रॉड मारून निर्घृण खून केल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. या प्रकारामुळे परिसरात खळबळ ऊयाळी आहे.

घटनास्थळी नागरिकांतून मिळालेली माहिती अशी की, विटा शहरातील मध्यवर्ती ठिकाण असलेल्या सुतारकीत एकाने पत्नीचा डोक्यात रॉड मारून खून केल्याने खानापूर तालुक्यासह विटा शहर हादरले आहे. मंगळवारी पहाटे खून



झाल्याचा प्रकार उघडकीस आला. विटा शहरातील सुतारकी या परिसरात काजल अविनाश लोटके या विवाहित महिलेचा तीच्या पतीनेच पत्नीच्या डोक्यात रॉडने हल्ला चढवून खून केल्याचे



उघडकीस आले. काजल लोटके हिचा पती अविनाश तुकाराम लोटके याने पत्नीचा खून करून घटनास्थळावरून पलायन केले आहे. काजल अविनाश लोटके व अविनाश तुकाराम लोटके हे पती-पत्नी मंगळवारी रात्री यात्रा फिरण्यासाठी गेले होते. यात्रा फिरून आल्यानंतर अविनाश लोटके व काजल लोटके या पती-पत्नीमध्ये दोघांचा किरकोळ कारणावरून वाद झाल्याचे घटनास्थळी नागरिकांनी सांगितले. या वादात अविनाश लोटके यांनी टोकाची भूमिका घेत पत्नी काजल लोटके हिच्या डोक्यात रागाच्या भरात रॉडने हल्ला केला. या हल्ल्यात काजल यांच्या डोक्यात जोराचा मार लागल्याने रक्तस्त्राव झाल्याने काजल यांचा जागीच मृत्यू झाला.

यावेळी संशयित आरोपी अविनाश लोटके याने पत्नीचा मृत्यू झाल्यानंतर त्याच्या लहान मुलाला बाजूच्या मित्राजवळ दिले व मला जरा काम आहे. मी बाहेर जाऊन येतो, असे सांगितले. आणि तो घटनास्थळावरून फरार झाला. हा प्रकार सकाळी उघडकीस आला. अविनाश लोटके यांनी आपल्या पत्नीचा खून का केला यासंदर्भात माहिती मिळू शकली नाही. या घटनेनंतर विटा पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक धनंजय फडतरे सह अंमलदार यांनी घटनास्थळी भेट दिली. सदर घटनेचा पंचनामा घटनास्थळी विटा पोलिसांनी करीत स्वतःच्या पत्नीच्या डोक्यात रॉडने हल्ला करून यांनी घटनास्थळावरून धुम ठोकली आहे. पत्नीचा खून करून पसार झालेल्या पतीच्या शोधासाठी पोलीस पथके रवाना करण्यात आली आहेत. या घटनेनंतर सुतारकी परिसरात बघ्यांची मोठी गर्दी झाली होती.

## वाखाण येथे कृष्णा नदीत आढळला अज्ञात व्यक्तीचा मृतदेह

**कराड/प्रतिनिधी:-**

शहरातील वाखाण परिसरात कृष्णा नदीत एका अज्ञात व्यक्तीचा बेवारस मृतदेह आढळून आल्याची घटना उघडकीस आली असून, यामुळे परिसरात एकच खळबळ उडाली आहे.

याबाबत मिळालेली माहिती अशी की, वाखाण परिसरातील स्थानिक शेतकरी आपल्या शेताजवळील नदीकाठावर गेले असता पाण्यात तरंगत असलेला मृतदेह त्यांच्या निदर्शनास आला. त्यांनी तात्काळ कराड शहर पोलिसांना याची माहिती दिली. माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली आणि बचाव पथकाच्या मदतीने मृतदेह बाहेर काढण्यात आला.

प्राथमिक तपासात मृतदेह हा पुरुषाचा असल्याचे निष्पन्न झाले असून, तो अत्यंत कुजलेल्या अवस्थेत आढळून आला. त्यामुळे ओळख पटविणे कठीण झाले आहे. मृत्यूचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नसून, आत्महत्या की घातपात याबाबत पोलिसांकडून सखोल तपास सुरू आहे.

# अज्ञात दुचाकीच्या धडकेत ८० वर्षीय वृद्धेचा मृत्यू

**शिराळा/प्रतिनिधी:-**

शिराळा तालुक्यातील बिऊर येथील मोरणा नदीच्या पुलाजवळ अज्ञात दुचाकीस्वाराने दिलेल्या धडकेत ८० वर्षीय महिलेचा मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना घडली आहे. किसाबाई बाळकू पाटील (रा. बिऊर, ता. शिराळा) असे मृत वृद्धेचे नाव आहे. याप्रकरणी अज्ञात दुचाकीस्वाराविरुद्ध शिराळा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.हा महिला श्री गोरक्षनाथ यात्रेसाठी आल्या होत्या.

मिळालेल्या माहितीनुसार, १३ एप्रिल २०२६ रोजी रात्री ७.३० वाजण्याच्या सुमारास किसाबाई पाटील या बिऊर गावच्या मोरणा नदीचा पूल ओलांडून कोकरूडकडे जाणाऱ्या रस्त्याने चालत जात होत्या. यावेळी कोकरूडकडे जाणाऱ्या रस्त्यावर एका अज्ञात दुचाकीस्वाराने आपल्या ताब्यातील वाहन भरधाव वेगात आणि रस्त्याच्या परिस्थितीकडे दुर्लक्ष करून चालवत



आणले. या दुचाकीने रस्त्याच्या उजव्या बाजूने चालत असलेल्या किसाबाई यांना समोरून जोराची धडक दिली.

या भीषण अपघातात किसाबाई यांच्या डोक्याला आणि हातापायाला गंभीर इजा झाली. त्यांना तातडीने उपचारासाठी उपजिल्हा रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले मात्र त्यांचा मृत्यू झाला. अपघात झाल्यानंतर संबंधित

पान २ वर

## अल्पवयीन मुलीवरील अत्याचार प्रकरणात लॉज मालकालाही अटक

### आरोपीला रूम उपलब्ध करून देणाऱ्या मालकावर कारवाई

**कराड/प्रतिनिधी:-**

अल्पवयीन मुलीचे अपहरण करून तिच्यावर लैंगिक अत्याचार केल्याच्या गंभीर प्रकरणात मुख्य आरोपीसह त्याला राहण्यासाठी खोली उपलब्ध करून देणाऱ्या लॉज मालकालाही कराड शहर पोलिसांनी अटक केली आहे. या कारवाईमुळे शहरातील बेकायदेशीर लॉज चालकांमध्ये मोठी खळबळ उडाली आहे.

याबाबत पोलिसांकडून मिळालेली माहिती अशी की, विद्यानगर परिसरातून १३ वर्षे १० महिन्यांच्या अल्पवयीन मुलीला फूस लावून पळवून नेल्याची घटना ८ एप्रिल रोजी उघडकीस आली होती. या प्रकरणी कराड शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल होताच पोलिसांनी तत्काळ तपास सुरू केला. अल्पवयीन मुलगी असल्याने या गुन्ह्याचा तपास प्राधान्याने करण्यात आला.

तांत्रिक विश्लेषण (सीडीआर) व सखोल तपासाच्या आधारे पोलिसांनी संबंधित मुलीचा शोध घेत सातारा येथून तिला सुरक्षित ताब्यात घेतले. पुढील चौकशीत अशुतोष चंद्रकांत कुंभार (वय २१) रा. कालगाव, ता. कराड याने तिला पळवून नेल्याचे स्पष्ट झाले. पोलिसांनी त्याला अटक केली.

तपासादरम्यान आरोपीला अत्याचार करण्यासाठी ओगलेवाडी येथील 'एस.के. रॉयल पॅलेस लॉजिंग'मध्ये खोली उपलब्ध करून देण्यात आल्याचे उघड झाले. त्यानुसार लॉज मालक शमशुदीन रसुल नदाफ (रा. शनिवार पेठ, कराड) यालाही पोलिसांनी ताब्यात घेऊन अटक केली.

पान २ वर

# साताऱ्यात डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्साहात

## फुले-शाहू-आंबेडकर साहित्य सदनाचे लोकार्पण

**सातारा/प्रतिनिधी:-**

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त सातारा नगरपरिषदेच्या वतीने यशवंत उद्यान येथे अभिवादनाचा कार्यक्रम मोठ्या उत्साहात पार पडला. यावेळी विविध मान्यवरांच्या उपस्थितीत डॉ. आंबेडकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून त्यांना अभिवादन करण्यात आले.

कार्यक्रमास खासदार श्रीमंत छत्रपती उदयनराजे भोसले, नामदार श्रीमंत छत्रपती शिवेंद्रसिंहराजे भोसले, नगराध्यक्ष अमोल मोहिते, उपनगराध्यक्ष ॲड. डी. जी. बनकर,

पान २ वर





### समर्थ माझे..

अघोर आरिष्ट येते
सहज परतून जाते
कळत नाही कधी
रे संकट आले होते
केवळ नाम स्मरणे
समर्था जुळते नाते
प्रवाह स्वता वाहतो
नौका पैलतीरी नेते
केवढे मोठे वादळ
नंतर जाणीव होते
म्हणालो होतो कधी
गणगण गणात बोते
स्वामी करती रक्षण
वलय अदृश्य असते
उणीवनाही भासली
मला जाणीव नसते
भोवती कडक उन्हे
सहज झळा सोसते
डोक्यावर स्वामीछत्र
सावलीकाळी दिसते
गंडांतर येवून परते
नंतर सगळे स्मरते
सद्गुरू तव महिमा
ती उरात मुरत उरते
झाडे उन्मळू पडली
हसते गवताचे पाते
अशक्त असून असा
वाचलो कसाउत्पाते
मागे वळा पहा जरा
कसले खडतर रस्ते
आलो कसा इथंवर
सोबत कोण फरिस्ते

**- हेमंत मुसरीफ पुणे**
९७३०३०६९९६

# कराडात आंबेडकर जयंतीचा अभूतपूर्व जल्लोष

## मध्यरात्री फटाक्यांची आतिषबाजी ;भव्य मिरवणूक,ढोल-ताशांचा गजर,मान्यवरांच्या हस्ते ध्वजारोहण व बुद्धवंदना

**कराड/प्रतिनिधी : -**

भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त कराड शहरात यंदा अभूतपूर्व जल्लोष अनुभवायला मिळाला. मध्यरात्रीपासूनच सुरू झालेल्या अभिवादन कार्यक्रमाने आणि हजारो भीमसैनिकांच्या उपस्थितीने डॉ. आंबेडकर चौक परिसर दुमदुमून गेला.

सोमवारी मध्यरात्री बारा वाजताच विविध मान्यवर, लोकप्रतिनिधी व नागरिकांनी डॉ. आंबेडकरांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी आकाशात झेपावणाऱ्या रंगीबेरंगी फटाक्यांच्या आतिषबाजीने संपूर्ण परिसर उजळून निघाला. आकर्षक रोषणाई आणि देखण्या सजावटीमुळे चौक परिसराचे रूपांतर उत्सवस्थळी झाले होते.

दिवसभर चाललेल्या कार्यक्रमांमध्ये सायंकाळी काढण्यात आलेली भव्य मिरवणूक विशेष आकर्षण ठरली. पारंपरिक ढोल-ताशांच्या गजरात, घोषणाबाजी आणि भीमगर्जनेने वातावरण भारावून गेले. विविध सामाजिक, सांस्कृतिक घटकांचा सहभाग असलेल्या या मिरवणुकीने शहरवासीयांचे लक्ष वेधून घेतले. रात्री उशिरापर्यंत सुरू असलेल्या या मिरवणुकीत युवकांसह महिलांचीही मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

या पार्श्वभूमीवर शहरातील वाहतूक व्यवस्थेतही मोठे बदल करण्यात आले होते. वाहतूक पोलिसांनी योग्य नियोजन व तत्परतेने कर्तव्य बजावत संभाव्य कोंडी टाळण्यात यश मिळवले. त्यामुळे



नागरिकांना मोठा दिलासा मिळाला.

कार्यक्रमाच्या मुख्य सोहळ्यात कराड दक्षिणचे आमदार डॉ. अतुल भोसले, नगराध्यक्ष राजेंद्रसिंह यादव, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे उदयसिंह पाटील-उंडाळकर, प्रांताधिकारी अतुल म्हेत्रे, पोलीस उपअधीक्षक राजश्री पाटील, पोलीस निरीक्षक दत्तात्रय दराडे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. यावेळी भीमजयंती उत्सव समितीचे अध्यक्ष राहुल भोसले, उपाध्यक्ष सुदेश थोरवडे, माजी नगरसेवक आनंदराव लादे व अन्य पदाधिकाऱ्यांनी कार्यक्रमाचे सुयोग्य नियोजन केले.

कार्यक्रमाची सुरुवात



मान्यवरांच्या हस्ते पंचरंगी ध्वजाचे ध्वजारोहण करून करण्यात आली. त्यानंतर बुद्धवंदना, भजन व गायन कार्यक्रमांनी वातावरण भक्तिमय झाले. सामाजिक ऐक्य, समता आणि बंधुभावाचा संदेश देत कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

# कृष्णा-कोयना पतसंस्थेचा २१० कोटींचा व्यवसाय पूर्ण

## नफा १.११ कोटींवर; 'अ' दर्जाचे ऑडिट कायम, २५० कोटींचे नवे लक्ष्य



**कराड/प्रतिनिधी : –**

कराडमधील कृष्णा-कोयना नागरी सहकारी पतसंस्थेने सातत्यपूर्ण प्रगतीची परंपरा कायम राखत मार्च २०२६ अखेर तब्बल २१० कोटी रुपयांच्या एकत्रित व्यवसायाचा टप्पा गाठला आहे. संस्थेच्या सक्षम धोरणांमुळे आणि काटेकोर आर्थिक नियोजनामुळे चालू आर्थिक वर्षातही सर्व आर्थिक निर्देशांक चढत्या क्रमाने राहिले असल्याची माहिती चेअरमन बाळासाहेब पाटील यांनी दिली.

संस्थेच्या वाढीचा वेग लक्षवेधी ठरत असून, सध्या ९ शाखा आणि १ मुख्य कार्यालयाच्या माध्यमातून ग्राहकांना सेवा दिली जात आहे. आर्थिक स्थितीचा आढावा घेतला असता, संस्थेच्या एकूण ठेवी १२१ कोटी १३ लाखांवर पोहोचल्या आहेत, तर कर्जवाटप ८९ कोटी १६ लाखांपर्यंत झाले आहे. याशिवाय ५० कोटी ३० लाखांची गुंतवणूक आणि १४६ कोटी १८ लाखांचे खेळते भांडवल संस्थेच्या भक्कम आर्थिक पायाभरणीचे द्योतक ठरत आहे.

योग्य आर्थिक तरतुदी आणि शिस्तबद्ध कारभारामुळे संस्थेला चालू वर्षात १ कोटी ११ लाख रुपयांचा निव्वळ नफा मिळाला आहे. संस्थेचा स्वनिधी १९ कोटी २८ लाखांवर पोहोचला असून स्थापनेपासून सातत्याने 'अ' दर्जाचे ऑडिट मिळवण्याची परंपरा कायम आहे. सभासदांना नियमित लाभांश देत संस्थेने विश्वासार्हतेची ओळख निर्माण केली आहे.

आधुनिकतेकडे वाटचाल करत संस्थेने स्वमालकीच्या चार इमारती उभारल्या असून सर्व शाखांचे कामकाज स्वतःच्या डेटा सेंटरवर आधारित कोअर बँकिंग प्रणालीद्वारे सुरळीतपणे सुरू आहे. ग्राहकांना NEFT, RTGS, बिल पेमेंटसारख्या अत्याधुनिक सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत.

संस्थेच्या सातत्यपूर्ण प्रगतीमुळे आता चालू आर्थिक वर्षात २५० कोटींच्या व्यवसायाचे महत्त्वाकांक्षी उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे.

या यशामागे महाव्यवस्थापक अरुण पाटील, व्हाईस चेअरमन, संचालक मंडळ, शाखा सल्लागार, अधिकारी, कर्मचारी तसेच सभासद व ग्राहकांचे मोलाचे योगदान असल्याचे चेअरमन पाटील यांनी नमूद केले.

# कडेगांव शहराला लवकरच स्मार्टसिटी करण्याचा माणस

## २८ लक्ष किमतीच्या विकास कामांचे भूमिपूजन नगराध्यक्ष धनंजय देशमुख यांच्या हस्ते संपन्न



कडेगांव शहरातील प्रभाग १६ व १७ मधील विकास कामांचे भूमीपूजन करताना कडेगांवचे नगराध्यक्ष धनंजय देशमुख, उपनगराध्यक्ष रंजना लोखंडे, सभापती अमोल डांगे, निलेश लंगडे, नगरसेविका मनीषा राजपूत, हाजी मुख्तार पटेल, संदीप गायकवाड यांच्यासह अन्य.

**कडेपूर/प्रतिनिधी:–**

कडेगांव नगरपंचायतीच्या निवडणुकीत कडेगांव शहरवासियानी मोठ्या विश्वासाने कडेगाव नगरपंचायतीची सत्ता भाजपाल दिली होती. शहरवासीयांनी दाखवलेल्या विश्वासाला कुठे ही गाल बोट न लागता माजी आ. पृथ्वीराज देशमुख व सांगली जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष संग्रामसिंह देशमुख यांच्या नेतृत्वाखाली निवडणुकीत दिलेल्या प्रत्येक आश्वासनाची पूर्तता केली असून शहरात सध्या रस्ता कॉंक्रिटीकरण, आरसीसी गटार बांधकाम पेव्हिंग ब्लॉक बसविण्याची कामे चालू असून शहरातील एकही विकासकाम प्रलंबित न ठेवता शहराला लवकरच सर्व सोयी सुविधायुक्त स्मार्ट सिटी करण्याचा माणस असल्याचे प्रतिपादन कडेगांवचे विद्यमान नगराध्यक्ष धनंजय देशमुख यांनी केले ते कडेगांव शहरातील प्रभाग क्रमांक १६ व १७ मधील मंजूर झालेल्या विविध विकासकामांच्या भूमिपूजनाप्रसंगी बोलत होते.

यावेळी उपनगराध्यक्ष रंजना लोखंडे, सार्व.बांधकाम सभापती पै.अमोल डांगे,आरोग्य सभापती निलेश लंगडे, नगरसेवक विजय गायकवाड, हाजी मुख्तार पटेल, नगरसेविका मनिषा राजपूत, भाजपाचे शहराध्यक्ष संदीप गायकवाड प्रमुख उपस्थित होते

यावेळी प्रभाग १७ मधील महेश भोसले घर ते हणमंत मिस्त्री घरापर्यंत रस्ता कॉंक्रिटीकरण करणे १४ लक्ष व प्रभाग १६ मधील गिरी गोसावी घर ते खुडे घरापर्यंत पाईपलाईन गटार व रस्ता कॉंक्रिटीकरण करणे १४ लक्ष अशा २८ लक्ष रुपयाच्या विकास कामाचे भूमिपूजन नगराध्यक्ष धनंजय देशमुख यांच्या शुभहस्ते संपन्न झाले.

यावेळी नगरसेवक सुधाकर चव्हाण, यूवराज राजपूत, माजी नगरसेवक हणमंत शिंदे, राकेश जरग, इंद्रजित पवार, जितेंद्र देशमुख, महेश भोसले, हणमंत रासकर, बाळू चौगुले, वैभव भोसले, रोहित चन्ने, दिग्विजय देशमुख यांच्या सह ग्रामस्थ उपस्थित होते.

# सातार्‍यात उत्साहात पार पडली 'समता दिंडी'

## डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन



**सातारा/प्रतिनिधी:–**

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीचे औचित्य साधून सातारा शहरात भव्य 'समता दिंडी' मोठ्या उत्साहात संपन्न झाली. सामाजिक समतेचा संदेश देणाऱ्या या दिंडीत विद्यार्थी आणि नागरिकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला.

या समता दिंडीची सुरुवात श्रीमंत छत्रपती प्रतापसिंह हायस्कूल येथून करण्यात आली. सातारा जिल्हा परिषद अध्यक्षा डॉ. प्रिया शिंदे यांच्या हस्ते दिंडीला हिरवा झेंडा दाखवून मार्गस्थ करण्यात आले.

या प्रसंगी जिल्हा परिषदेचे उपाध्यक्ष राजू भोसले, जिल्हाधिकारी संतोष पाटील, मुख्य कार्यकारी अधिकारी याशनी नागराजन, पोलीस अधीक्षक तुषार दोशी, जात पडताळणी समितीचे अध्यक्ष जीवन गलांडे, प्रांताधिकारी आशिष बारकुल, तहसीलदार समीर यादव, समाज कल्याणचे सहायक आयुक्त सुनिल जाधव, जात पडताळणी समितीचे उपायुक्त उमेश घुले, समाज कल्याण अधिकारी श्रुती रकटे यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

प्रतापसिंह हायस्कूल येथून निघालेली ही दिंडी राजपथावरून मार्गस्थ झाली. दिंडीचा समारोप सातारा नगर पालिका येथील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णकृती पुतळ्यापाशी झाला. यावेळी उपस्थित सर्व मान्यवरांनी पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विचार जनसामान्यांपर्यंत पोहोचवण्यासाठी आणि समतेचा संदेश देण्यासाठी अशा उपक्रमांची गरज आहे, अशा भावना यावेळी व्यक्त करण्यात आल्या.

या दिंडीमध्ये शालेय विद्यार्थ्यांनी ढोल-ताशांच्या गजरात आणि घोषणांच्या जयघोषात सहभाग घेतला, ज्यामुळे संपूर्ण सातारा शहर आंबेडकरमय झाले.

# खा.धनंजय महाडिक व माजी नगराध्यक्ष वैभव पाटील यांचे भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त अभिवादन



**विटा / प्रतिनिधी:–**

सांगली जिल्ह्यातील खानापूर तालुक्यातील विटा शहरातील मध्यवर्ती ठिकाणी असणारा भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास भाजपचे खासदार धनंजय महाडिक व विटा नगरपरिषदेचे माजी नगराध्यक्ष भाजपचे युवा नेते ड.वैभव दादा पाटील यांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.

या वेळी खासदार धनंजय महाडिक यांनी आपले विचार व्यक्त केले तर भाजपचे युवा नेते वैभव दादा पाटील यांनी आपल्या सहकाऱ्यांसह खासदार धनंजय महाडिक यांना जय भीम म्हणत जोरदार घोषणाबाजी करत खासदार धनंजय महाडिक यांचा पुष्पगुच्छ शाल श्रीफळ देऊन सत्कार केला.

या वेळी नगरसेवक अजित दादा गायकवाड, सुमित गायकवाड, माजी उपनगराध्यक्ष सुभाष भिंगारदेवे, माजी नगरसेवक प्रशांत कांबळे, भरत कांबळे, अविनाश चोथे, विकास जाधवसह महिला वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होता.

या वेळी विटा शहर या संदर्भात पाटील व महाडिक यांच्यात चर्चा झाली. छत्रपती शिवाजी महाराज यांच्याही पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून खासदार धनंजय महाडिक व युवा नेते वैभव दादा पाटील यांनी नतमस्तक होऊन छत्रपती शिवाजी महाराज की जय असे म्हणत आपले मनोगत व्यक्त केले.

# डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांना भाजपकडून अभिवादन

## विचारांच्या प्रसाराचा भाजपचा निर्धार



**ईश्वरपूर / प्रतिनिधी:–**

भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार, सामाजिक न्यायाचे प्रणेते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त भारतीय जनता पक्षाच्या वतीने अभिवादन करण्यात आले. विविध ठिकाणी कार्यक्रमांचे आयोजन करून त्यांच्या कार्याचा गौरव करण्यात आला आणि त्यांच्या विचारांचा प्रसार करण्याचा निर्धार भाजप नेत्यांकडून व्यक्त करण्यात आला.

या निमित्ताने आयोजित कार्यक्रमात भाजप पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. सर्वप्रथम डॉ. आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. त्यानंतर उपस्थित मान्यवरांनी त्यांच्या कार्याचा आढावा घेत, भारतीय समाजव्यवस्थेत त्यांनी घडवून आणलेल्या परिवर्तनाची आठवण करून दिली.

भाजप नेते विक्रमभाऊ पाटील म्हणाले , डॉ. आंबेडकर यांनी सामाजिक विषमता, अस्पृश्यता आणि अन्यायाविरुद्ध अखंड लढा दिला. शिक्षण, समता आणि बंधुता या तत्त्वांवर आधारित समाजरचना उभी करण्यासाठी त्यांनी आयुष्य झोकून दिले. त्यांच्या विचारांमुळेच देशाला एक सशक्त आणि समताधिष्ठित संविधान प्राप्त झाले आहे.

युवकांना डॉ. आंबेडकर यांच्या विचारांपासून प्रेरणा घेऊन समाजहितासाठी कार्य केले पाहिजे. डॉ. आंबेडकर यांच्या स्वप्नातील समतामूलक समाज निर्माण करण्यासाठी सर्वांनी एकत्रित प्रयत्न करण्याची गरज असल्याचे माजी नगराध्यक्ष ऍड चिमणभाऊ डांगे यांनी सांगितले.

डॉ. आंबेडकर यांच्या विचारांना नव्याने उजाळा मिळाला असून, त्यांच्या कार्याचा वारसा पुढे नेण्याचा निर्धार भाजपचा निर्धार आहे. समाजातील वंचित व दुर्बल घटकांच्या उन्नतीसाठी शासनाच्या विविध योजनांची माहिती सांगली जिल्हा बँकेचे संचालक राहुल महाडीक यांनी दिली.

यावेळी ईश्वरपूर मंडल अध्यक्ष संदीपराज पवार भाजप नेते विश्वनाथ डांगे, नगरसेवक राजवर्धन पाटील नगरसेविका अनिता ओसवाल , मोहन वळसे , धिरज शेजवळे ,दिग्विजय उरणे ,संजय हवलदार , कपील ओसवाल,प्रसाद पाटील, सोमनाथ फल्ले, संजय पोरवाल,अमित कदम ,महादेव करे, रामभाऊ शेवाळे उपस्थित होते.



गोडवलीत टाळ-मृदंगाचा गजर आणि भक्तीचा जागर ;ग्राम प्रदक्षिणेने अवघी नगरी विठ्ठलमय

# गोडवलीच्या विकासासाठी कटिबद्ध ;ना.मकरंद आबा पाटील



**पाचगणी/प्रतिनिधी:–**

विशेष प्रतिनिधी अध्यात्म, सामाजिक एकता आणि विकासाची परंपरा जपणाऱ्या गोडवली गावात 'विठ्ठल रखुमाई मंदिर वर्धापन दिन' आणि 'अखंड हरिनाम सप्ताहा'च्या निमित्ताने भक्तीचा महापूर ओसांडून वाहिला. टाळ-मृदंगाच्या अखंड निनादात आणि पुंडलिक वरदे हरी विठ्ठलच्या जयघोषात निघालेल्या भव्य ग्राम प्रदक्षिणेने संपूर्ण गोडवली नगरीला पंढरीचे स्वरूप प्राप्त झाले होते. या सोहळ्याप्रसंगी मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद आबा पाटील यांनी उपस्थित राहून ग्रामस्थांशी संवाद साधला.

भक्तिमय ग्राम प्रदक्षिणा आणि दिंडी सोहळा सप्ताहाच्या सांगता निमित्त आयोजित केलेली 'ग्राम प्रदक्षिणा' हे या उत्सवाचे मुख्य आकर्षण ठरले. पहाटेपासूनच विठ्ठल भक्तांच्या मांदियाळीने मंदिर परिसर फुलून गेला होता. सजवलेली पालखी आणि हातात भगव्या पताका घेतलेले वारकरी जेव्हा गावातून निघाले, तेव्हा वातावरण चैतन्यमय झाले. टाळ-मृदंगाच्या तालावर आणि चिपळ्यांच्या ठेक्यावर विठ्ठल वारकरी संस्थेचे विद्यार्थी आणि ग्रामस्थांनी धरलेला फेर पाहून उपस्थित मंत्रमुग्ध झाले. महिलांनी पारंपारिक वेशभूषेत या दिंडीत उत्स्फूर्त सहभाग नोंदवत फुगड्यांचा आनंद लुटला. गावातील प्रत्येक उंबरठ्यावर रांगोळ्या काढून आणि पालखीचे पूजन करून ग्रामस्थांनी या भक्ती सोहळ्याचे स्वागत केले.

विकासासाठी मी कटिबद्ध : मकरंद आबा पाटील या सोहळ्यादरम्यान बोलताना ना. मकरंद आबा पाटील म्हणाले की, नरवीर तानाजी मालुसरे यांची ही जन्मभूमी अध्यात्मिक आणि शैक्षणिक क्षेत्रात नेहमीच आघाडीवर राहिली आहे. गोडवली गाव मी आमदार म्हणून दत्तक घेतले असून, येथील एकीच्या जोरावर अनेक विकासकामे मार्गी लागली आहेत. ग्रामस्थांनी माझ्यावर जे प्रेम केले, त्याची परतफेड मी गावाचा कायापालट करूनच करेन. उर्वरित कामांसाठी निधीची कोणतीही कमतरता भासू देणार नाही.

सांस्कृतिक आणि आध्यात्मिक कार्यक्रमांची रेलचेल या उत्सवात ह.भ.प. शारदाताई महाराज खोपडे आणि ज्योतीताई महाराज मतकर यांची रसाळ कीर्तने पार पडली. तसेच आनंदराव शाहीर यांचा भारुडाचा कार्यक्रम आणि आसपासच्या भिलार, आंब्रळ, खिंगर यांसारख्या अनेक गावांतील भजन मंडळांनी आपली सेवा रुजू केली. विशेष कौतुक झाले ते गोडवली महिला मंडळाच्या ताल नृत्य पथकाचे; त्यांनी सादर केलेल्या 'संत गोरा कुंभार' या जिवंत नाट्याने प्रेक्षकांच्या डोळ्यांचे पारणे फेडले. जिल्हा परिषद शाळेच्या मुलांनीही आपल्या सांस्कृतिक कलेतून गावच्या गुणवत्तेचे दर्शन घडवले.

याप्रसंगी जिल्हा बँकेचे संचालक राजेंद्रशेठ राजपुरे यांनीही मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक अंकुश आबा मालुसरे यांनी केले, तर आभार आर. डी. मालुसरे आणि योगेश मालुसरे यांनी मानले. या सोहळ्याने गोडवली गावच्या धार्मिक आणि सामाजिक एकतेचे दर्शन पुन्हा एकदा सर्वांना घडवले.



# बाबासाहेबांचा समता, बंधुता व सामाजिक न्यायाचा संदेश आजही प्रेरणादायी

## आनंदराव पाटील; कराडमध्ये जयंतीनिमित्त अभिवादन; विविध क्षेत्रातील मान्यवरांची उपस्थिती

**कराड/प्रतिनिधी : –**

भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेला समता, बंधुता आणि सामाजिक न्यायाचा विचार आजच्या काळातही तितकाच प्रेरणादायी आणि मार्गदर्शक आहे, असे प्रतिपादन माजी आमदार आनंदराव पाटील (नाना) यांनी केले.

कराड शहरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकात त्यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त आयोजित अभिवादन कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी आनंदराव पाटील यांनी बाबासाहेबांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून कृतज्ञतापूर्वक अभिवादन केले.

कार्यक्रमास विविध क्षेत्रातील मान्यवर, सामाजिक व युवा कार्यकर्ते, तसेच नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. आर.पी.आयचे अध्यक्ष आप्पासाहेब गायकवाड, नगरसेवक राहुल भोसले, भागवत कांबळे, शुभम लादे, शरद गाडे, प्रशांत थोरवडे, सचिन आढाव, प्रवीण लादे, अभिजित पवार यांच्यासह अनेक कार्यकर्त्यांनीही यावेळी बाबासाहेबांना अभिवादन केले.

# गोरक्षनाथ यात्रेनिमित्त शिराळा येथे १८ रोजी कुस्ती मैदान

## महाराष्ट्र केसरी सिकंदर शेख विरुद्ध गामा गुज्जर पंजाब यांची कुस्ती


**शिराळा/प्रतिनिधी : –**

येथील श्री महायोगी गोरक्षनाथ यात्रेनिमित्त कुस्तीचे जंगी मैदान आयोजित करण्यात आले असून, कुस्ती मैदान अधिक रंगतदार होणार आहे. हनुमान व्यायाम मंडळ, यात्रा कमिटी व ग्रामस्थांच्या संयुक्त विद्यमाने शनिवार, दि. १८ रोजी दुपारी ४ वाजता श्री गोरक्षनाथ मंदिर परिसरात या कुस्त्या पार पडणार आहेत.

या मैदानात महाराष्ट्र केसरी सिकंदर शेख विरुद्ध गामा गुज्जर पंजाब, महाराष्ट्र केसरी पृथ्वीराज पाटील विरुद्ध उपमहाराष्ट्र केसरी पै. प्रकाश बनकर, तसेच पै. उदय खांडेकर आणि पै. दिग्विजय जाधव यांसारख्या पैलवानांच्या लढती प्रेक्षकांसाठी विशेष आकर्षण ठरणार आहेत. कार्यक्रमास मठाधिपती पीर पारसनाथ महाराज, आमदार सत्यजित देशमुख,भाजप जिल्हाध्यक्ष सम्राट महाडिक व नगराध्यक्ष पृथ्वीसिंग नाईक यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे.

शिराळा व पंचक्रोशीतील कुस्ती प्रेमींनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून या जंगी कुस्ती मैदानाचा आनंद घ्यावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे. कुस्ती स्पर्धेचे नियोजन बांधकाम सभापती राजसिंह पाटील, सम्राट शिंदे, सचिन नलावडे, नगरसेवक केदार नलावडे, राहुल खबाले, प्रा. सुशीलकुमार गायकवाड, उत्तम निकम, पै. अभिजित शेणेकर हे करत आहेत.

# मोहनराव डकरे सर यांचे निधन



**कराड/प्रतिनिधी:–**

आटके ता. कराड येथील दानशूर बापूसाहेब यशवंतराव पाटील विद्यालयाचे माजी मुख्याध्यापक, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानच्या कराड विभागीय कार्यालयाचे माजी ग्रंथपाल मोहनराव कृष्णाजी डकरे (वय ९१) रा. शुक्रवार पेठ, कराड यांचे आज वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पश्चात दोन मुली, एक डॉक्टर मुलगा, सून, नातवंडे असा परिवार आहे.

अंत्यविधी सायंकाळी ८ वाजता कराड वैकुंठधाम येथे होणार आहे.

# डॉ.आंबेडकरांचे कार्य शब्दात मांडणे अशक्य: रणधीर नाईक



**शिराळा/प्रतिनिधी : –**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी अथक परिश्रमाने आणि संघर्षाने समाजातील वंचित, शोषित आणि पीडित घटकांना न्याय, स्वातंत्र्य, समता आणि बंधुता यांचा मार्ग दाखवला. अशा महामानवाचे कार्य शब्दात मांडणे अशक्य आहे. त्यांनी दिलेला संविधानाचा अमूल्य वारसा आणि शिक्षणाचा मंत्र आजही प्रत्येकाला पुढे जाण्याची प्रेरणा देत असल्याचे प्रतिपादन सांगली जिल्हा मध्यवर्ती बँकेचे उपाध्यक्ष रणधीर नाईक यांनी केले.

येडेनिपाणी, (ता. वाळवा) येथे भारतीय संविधानाचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा जयंती उत्सव मोठ्या उत्साहात साजरा झाला. यावेळी रणधीर नाईक यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले त्यावेळी ते बोलत होते.

नाईक म्हणाले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी, 'शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा' हा दिलेला संदेश आजही आपल्या प्रत्येकाच्या जीवनाचा मार्गदर्शक आहे. त्यांच्या विचारांमुळेच आपण आज स्वाभिमानाने जगत आहोत, आपण आपल्या हक्कांसाठी लढत समाजात समतेची ज्योत पेटवत आहोत. डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीच्या पवित्र दिनी आपण सर्वांनी त्यांच्या विचारांचा स्वीकार करून अन्यायाविरुद्ध लढण्याचा, शिक्षण घेण्याचा आणि समाजात बंधुता वाढवण्याचा संकल्प करूया असे नाईक यांनी सांगितले.

यावेळी इस्लामपूर मार्केट कमिटीचे संचालक सी.एच. पाटील, सरपंच सौ. शामबाला माळी, माजी पंचायत समिती सदस्य आनंदराव पाटील, नंदकुमार पाटील, डॉ. सचिन पाटील, मोहन पाटील, माजी उपसरपंच संजय लोहार, महेश शिंदे, उपसरपंच किरण पाटील, रूपाली शिंदे, शीतल पाटील, स्वाती कोळेकर, सचिन यादव, दिपाली हांडे, दिनकर हांडे, बंटी कांबळे, रोहित धारे, शरद हांडे, माजी सरपंच विजय बनसोडे, प्रियांका कांबळे, हर्षली कांबळे, ऐश्वर्या कांबळे व मोठया प्रमाणात महिला पुरुष उपस्थित होते.


**सदर शुंभाक हे संख्याशास्त्र व ज्योतिष शास्त्रावर आधारीत आहे कृपया दुरुपयोग करु नये.**

### नशिबाची परीक्षा

बुधवार १५ एप्रिल २०२६

**मिलनम डे**

उदय-अस्त — सिंगल ९-२-५ मजबुत

| | | | जोड |
|---|---|---|---|
| 120 346 490 | 3-7 | 124 179 115 | 31-97-62-04-75 |

**कल्याणम**

उदय-अस्त — सिंगल ०-४-१ मजबुत

| | | | जोड |
|---|---|---|---|
| 147 246 660 | 2-4 | 158 149 112 | 26-04-91-58-43 |

**मुंबैम ( मेन )**

उदय-अस्त — सिंगल ८-७-२ मजबुत

| | | | जोड |
|---|---|---|---|
| 150 169 114 | 6-3 | 139 580 670 | 60-23-71-45-39 |

दिवाळी बंपर चान्सू तयार आहे संपर्क क्रमांक मो.नं. ९९७५४७९८२६

### आज का अंदाज

बुधवार दिनांक १५ एप्रिल २०२६

| कल्याण बाजार 'पत्थर फोड एकच' | मुंबई बाजार 'पत्थर फोड एकच' |
|---|---|
| ३ - ६ - ९ - ० | ३ - ४ - ७ - ८ |
| १४८-१५०-२३४-२३५ | १३९-१५८-२५०-१२५ |
| ३४६-२६८-३७९-३७० | ४९०-२५७-३६८-२७९ |
| ५८०-७९०-४७८-४६० | ५९९-६८०-१६०-३६९ |
| जोडी | जोडी |
| ३१ - ६१ - ९८ - ०८ | ३० - ४० - ७१ - ८१ |
| ३५ - ६५ - ९४ - ०४ | ३६ - ४६ - ७२ - ८२ |
| ३७ - ६७ - ९२ - ०२ | ३९ - ४९ - ७५ - ८५ |

जबरदस्त पास होणारे चान्सेस दि. १५-१६ एप्रिल

प्रो.बालाजी कुमार मो.नं. ९८२२४८६०३४

बुधवार दिनांक १५ एप्रिल २०२६

| सर्व बाजार साठी | |
|---|---|
| | १० - ४० - ५२ - ८२ |
| | १९ - ४९ - ५३ - ८३ |
| | १७ - ४७ - ५६ - ८६ |
| | ६७८ - ११२ - २३० - १८९ |
| | ५७९ - २२० - ३५७ - ३७८ |
| | ३३५ - ३३८ - ४५६ - २२४ |

प्रो.बालाजी कुमार मो.नं. ९८२२४८६०३४

# सांगली जिल्हा परिषदेला राज्यात अव्वल स्थानावर आणा

## आ. जयंत पाटील



**शिराळा/प्रतिनिधी : –**
सांगली जिल्हा परिषदेला राज्यात अव्वल स्थानावर नेण्यासाठी सर्वांनी एकजुटीने काम करत जनतेचा विश्वास संपादन करावा, असा ठाम सल्ला माजी मंत्री जयंतराव पाटील यांनी दिला.

कासेगाव ता वाळवा येथे सांगली जिल्हा परिषद नूतन पदाधिकारी व सदस्य यांचा सत्कार करताना आयोजित सत्कार समारंभात ते बोलत होते.

आ. पाटील म्हणाले, २०१९ साली आघाडी सरकारच्या काळात राबविण्यात आलेल्या 'स्मार्ट पीएचसी' उपक्रमामुळे जिल्ह्यातील तब्बल ४२ लाख रुग्णांना प्राथमिक आरोग्य सेवा मिळाली, हे या योजनेचे मोठे यश आहे. जिल्हा परिषद व पंचायत समिती सदस्यांना मोठी संधी मिळाली असून पारदर्शक व लोकाभिमुख कारभार करत जनतेपर्यंत काम पोहोचवावे, असे त्यांनी सांगितले. जे काम कराल ते प्रभावीपणे लोकांपर्यंत पोहोचले पाहिजे, पुढील निवडणुकीतही जनतेने तुम्हालाच निवडून द्यावे, अशी भावना निर्माण झाली पाहिजे.

यावेळी खासदार विशाल पाटील यांनी दादा-बापू वादामुळे जिल्ह्याचे नुकसान झाल्याचे नमूद करत आता सर्वांनी मतभेद विसरून जातीयवादी विचारांविरोधात एकत्र लढा देण्याचे आवाहन केले.

माजी मंत्री विश्वजीत कदम यांनी सध्याचा काळ संघर्षाचा असल्याचे सांगत, जनतेच्या पाठबळावर कोणतेही आव्हान पेलण्याचा विश्वास व्यक्त केला. तर शिवाजीराव नाईक यांनी विकासकामांवर भर देण्याची गरज अधोरेखित केली. तर शिवाजीराव नाईक विशाल पाटील, देवराज पाटील, मानसिंगराव नाईक , विक्रम सावंत यांनी मनोगत व्यक्त केले.

समारंभात जिल्हा परिषद अध्यक्षा संगीता पाटील, उपाध्यक्ष ऋषिकेश लाड, सभापती व सदस्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी अध्यक्ष संगीता पाटील उपाध्यक्ष ऋषिकेश लाड, माजी आम. मानसिंगराव नाईक , विक्रम सावंत. देवराज पाटील, मनोज शिंदे, विनायक पाटील, वाळवा पंचायत समितीचे सभापती उदय पाटील, उपसभापती प्रकाश पाटील, बाळासाहेब पाटील, जिल्हा परिषदेचे सभापती दादासाहेब कोळेकर, सभापती स्नेहलताई मोरे पाटील, लिंबाजी पाटील व जिल्हा परिषद सर्व सदस्य, जिल्ह्यातील प्रमुख मान्यवर उपस्थित होते. जिल्हा परिषद व पंचायत समिती सदस्य, तसेच ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित

# सातार्‍यात पालकमंत्र्यांविरोधात दिव्यांगांचा संताप

## जिल्हाधिकारी कार्यालया समोर जोरदार आंदोलन




**सातारा/प्रतिनिधी:–**
जिल्ह्याचे पालकमंत्री शंभूराज देसाई यांच्या निषेधार्थ सातार्‍यात दिव्यांग बांधवांनी तीव्र आंदोलन छेडत शासनाचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला. विविध प्रलंबित मागण्यांकडे दुर्लक्ष होत असल्याचा आरोप करत आंदोलकांनी घोषणाबाजी करत आपला रोष व्यक्त केला.

दिव्यांगांसाठी राखीव असलेल्या ५ टक्के निधीचे योग्य आणि पारदर्शक वाटप होत नसल्याची गंभीर तक्रार यावेळी करण्यात आली. शासनाच्या धोरणांमध्ये स्पष्टता नसल्याने दिव्यांगांना न्याय मिळत नसल्याचा आरोपही आंदोलकांनी केला. तसेच अधिकारी तुकाराम मुंढे यांची बदली तात्काळ रद्द करण्यात यावी, अशी ठाम मागणी आंदोलनकर्त्यांनी केली.

या आंदोलनात अध्यक्ष अजय पवार यांच्या नेतृत्वाखाली शैलेंद्र बोर्डे, अमोल भातुसे, अमोल निकम, संजय प्रकाशे, शांताराम देवरे, दिलखुष गायकवाड, बाळासाहेब रेवले, प्रशांत बगले, गणेश किर्दत, संतोष भोसले, पांडुरंग शेलार, चंद्रकांत निंबाळकर, संजय भाऊ, हरिभाऊ साळुंखे, भुराडे काका, दशरथ लोखंडे, सागर सरडे, महेश चव्हाण, लतिका जगताप, शोभा मोरे, श्रीमती ओंबळे, माधवी भोसले आदी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

आंदोलनादरम्यान जोरदार घोषणाबाजी करण्यात आली. कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी पोलिसांचा कडक बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. आंदोलन शांततेत पार पडले असले, तरी दिव्यांगांच्या मागण्यांकडे प्रशासनाने तातडीने लक्ष द्यावे, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली.

# विट्यातील कामात कुचराई केल्याबद्दल केंद्रस्तरीय अधिकार्‍यावर गुन्हा दाखल ;कारवाईचा बडगा



**विटा / प्रतिनिधी:–**
सांगली जिल्ह्यातील खानापूर विटा विधानसभा मतदारसंघातील निवडणूक आयोगाच्या अत्यंत महत्त्वाच्या एसआयआर मॅपिंग कामात झालेल्या हलगर्जीपणाच्या प्रकरणी एका केंद्रस्तरीय अधिकार्‍यावर ( बीएलओ) विटा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे. निवडणूक प्रक्रिया राष्ट्रीय कर्तव्य असून सुद्धा त्यात टाळाटाळ करणार्‍या कर्मचार्‍यावर प्रशासनाने फौजदारी सुरू केली आहे.

विटा येथील उपविभागीय अधिकारी यांच्या आदेशानुसार विधानसभा मतदारसंघांमध्ये एसआयआर मॉपिंगचे काम युद्ध पातळीवर सुरू आहे या कामासाठी दिगंबर पांडुरंग खाडेकर ( शिक्षक, अमर कोष्टी शाळा, केंद्रस्तरीय अधिकारी भाग क्रमांक ४८ विटा ) यांची नियुक्ती करण्यात आली होती. मात्र, खाडेकर यांना सोपविण्यात आलेल्या कामापैकी फक्त ७ टक्के काम पूर्ण केल्याचे वरिष्ठ अधिकार्‍यांना आढळले. निवडणूक कामाचे गांभीर्य लक्षात घेऊन खाडेकर यांना वारंवार लेखी नोटीसा बजावण्यात आल्या होत्या. आणि आढावा बैठकींना उपस्थित राहण्याचे निर्देश दिले होते. त्यांनी मात्र नोटिसाकडे दुर्लक्ष केले आणि बैठकींना अनुपस्थितीत राहिले. या कारणास्तव खाडेकर यांनी प्रशासकीय आदेशाचे उल्लंघन केल्यामुळे आणि निवडणूक कामात अडथळा निर्माण केल्यामुळे त्यांच्याविरुद्ध ही कारवाई करण्यात आली आहे, असे विटा नगरपरिषदेचे कर अधीक्षक संदीप विष्णू वाघमारे यांनी विटा पोलीस ठाण्यात फिर्याद दिल्यानुसार दिगंबर खाडेकर यांच्या विरोधात विटा पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

# ..तर, ३० एप्रिलला वारणा धरण-कोल्हापूर शेतकर्‍यांचा लॉन्ग मार्च

## डॉ. पाटणकर :गुढे-पाचगणी येवती उपसा सिंचन योजनेसाठी १०५ गावांचा इशारा

**उंडाळे/प्रतिनिधी : –**
गुढे-पाचगणी येवती उपसा सिंचन योजनेला तांत्रिक मंजुरी व शासनाकडून निधी उपलब्धतेची लेखी हमी २९ एप्रिलपर्यंत दिली नाही, तर ३० एप्रिल रोजी वारणा धरणापासून कोल्हापूर येथील कृष्णा खोरे कार्यालयावर शेतकर्‍यांचा भव्य लॉन्ग मार्च काढण्यात येईल, असा इशारा डॉ. भारत पाटणकर यांनी दिला.

शिराळा तालुक्यातील मानेवाडी येथे आयोजित शिराळा, कराड आणि पाटण तालुक्यातील १०५ वंचित गावांच्या शेतकरी मेळाव्यात ते बोलत होते. या मेळाव्यास माजी सभापती हणमंतराव पाटील, तानाजी पाटील, वसंत पाटील, शंकर मोहिते, शिवाजी पाटील, बाळासाहेब माने, उदय पाटील, संदीप पाटील, सचिन मोरे, सखाराम पाटील, बाबासो पवार यांसह अनेक मान्यवर उपस्थित होते.

डॉ. पाटणकर म्हणाले, या सिंचन योजनेसाठी गेल्या अनेक वर्षांपासून सातत्याने आंदोलन, मंत्रालयातील पाठपुरावा, तसेच पुणे, कोल्हापूर आणि कृष्णा खोरे कार्यालयातील बैठका घेण्यात आल्या. या प्रयत्नांमुळे अनेक प्रशासकीय टप्पे पूर्ण झाले असले, तरी अद्याप नाशिक स्तरावरील आराखड्याला तांत्रिक मंजुरी आणि शासनाकडून निधीची स्पष्ट लेखी हमी मिळालेली नाही. निधी मंजुरीबाबत प्रसिद्ध झालेल्या बातम्या व जाहिरातींवर विश्वास ठेवता येत नसल्याचे त्यांनी स्पष्ट करत, अधिकार्‍यांकडून अधिकृत लेखी हमी मिळणे अत्यावश्यक असल्याचे सांगितले. अन्यथा, या भागातील शेतकरी ३० एप्रिल रोजी सकाळी १० वाजता वारणा धरणापासून कोल्हापूरकडे पायी मोर्चा काढतील, असा ठाम इशारा त्यांनी दिला.



मेळाव्यात हणमंतराव पाटील, बाळासाहेब माने, सखाराम पाटील, उदय पाटील, संदीप पाटील, सचिन मोरे, सुरेश पाटील, संचालक शिवाजी पाटील, सुनील शिंदे, एकनाथ मोहिते यांनीही आपल्या भाषणांतून योजनेच्या तातडीच्या मंजुरीची मागणी केली. यावेळी शिराळा, कराड आणि पाटण तालुक्यातील शेतकरी व महिलांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# पाणी टंचाईबाबत ४८ तासांत उपाय करा

## ना.मकरंद पाटील:वाईत तालुक्याच्या आढावा बैठकीत दिले निर्देश



**वाई/प्रतिनिधी:–**
वाईत पाणी टंचाई व प्रशासकीय कामकाज आढावा बैठक संपन्न. वाई तालुक्यातील पिण्याच्या पाण्याची टंचाई लक्षात घेता प्रशासनाने प्रस्तावांवर गांभीर्याने लक्ष देऊन ४८ तासांत उपाय योजना कराव्यात. उन्हाळ्यात वीज बिल थकबाकी असली तरी कोणत्याही गावाचा वीज पुरवठा खंडित करू नका, असे निर्देश मदत व पुनर्वसन मंत्री ना. मकरंद पाटील यांनी दिले. या पंचायत समितीच्या किसनवीर सभागृहात आयोजित पाणी टंचाई व प्रशासकीय कामकाज आढावा बैठकीत ते बोलत होते.

यावेळी ना. पाटील यांनी कवठे केंजळ उपसा सिंचन योजनेची व्याप्ती वाढवून जास्तीत जास्त क्षेत्राला लाभ देण्याचा मानस व्यक्त केला. पाणी पुरवठ्यात अडथळे आणणार्‍यांवर गुन्हे दाखल करण्याच्या सूचनाही त्यांनी दिल्या.

बैठकीस प्रांताधिकारी डॉ. योगेश खरमाटे, तहसीलदार श्रीमती सोनाली मेटकरी, गट विकास अधिकारी नारायण घोलप, डी.वाय.एस.पी. सुनील साळुंखे, वीज वितरण कार्यकारी अभियंता विशाल शिवतारे, उपअभियंता गोंजारी, गटशिक्षणाधिकारी हर्षवर्धन मोरे, सभापती भैय्या डोंगरे, उपसभापती सौ. वर्षा जगताप, सदस्य शैलेश सपकाळ, स्वप्नील गायकवाड, कु. हर्षदा फरांदे, राणी पवार, जिल्हा परिषद सदस्य दिलीप बाबर, बापूसाहेब शिंदे, श्रीमती वृषाली चव्हाण, वाईचे नगराध्यक्ष अनिल सावंत उपस्थित होते.

प्रशासकीय माहितीनुसार, तालुक्यात २० गावे आणि २२ वाड्या टंचाईग्रस्त असून सध्या ७ ठिकाणी टँकरने पुरवठा सुरू आहे. मे महिन्यात ही संख्या वाढण्याची शक्यता आहे. धोम आणि बलकवडी धरणांत ४०% पाणीसाठा शिल्लक असून त्याचे सूक्ष्म नियोजन करण्याचे आदेश मंत्र्यांनी दिले. मुख्याधिकारी संजीवनी दळवी यांनी पाणीपुरवठा ठेकेदार संत गतीने काम करत असल्यामुळे नागरिकांच्या तक्रारी येत असल्याचे सांगितल्यावर कामे जलद गतीने, वेळप्रसंगी पोलीस बंदोबस्तात करण्याचे निर्देश मंत्री महोदयांनी दिले .

प्रांत डॉ. योगेश खरमाटे यांनी 'मुख्यमंत्री ग्राम शेत पांनंद रस्ता' योजनेची माहिती दिली. वहिवाटीतील रस्त्यांवरील अतिक्रमणे काढून जास्तीत जास्त प्रस्ताव पाठवण्याचे आवाहन त्यांनी केले. ना. पाटील यांनीही सरपंच व शेतकर्‍यांना या योजनेचा लाभ घेण्याचे सुचवले.

या बैठकीत तानाजी जगताप, अनिल कोंढावळे, लक्ष्मण पवार, उदयसिंह पिसाळ, दत्ता मांढरे, प्रशांत शिंगटे, मोहनराव जाधव, दत्तात्रय जेधे, महादेव वाडकर, अविनाश गाढवे, महेंद्र गुरव यांनी समस्या मांडल्या.

# राज्यघटनेच्या विचारांवर देशाची व राज्याची वाटचाल

## बाळासाहेब पाटील ;डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास जयंतीनिमित्त अभिवादन



**कराड/प्रतिनिधी : –**
देश व राज्याचा विकास हा राज्यघटनेच्या मजबूत पायावर उभा असून, राज्यघटनेच्या विचारांवर देश-राज्याची वाटचाल सुरु असल्याचे प्रतिपादन माजी मंत्री बाळासाहेब पाटील यांनी केले.

शहरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकात त्यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त राज्याचे माजी सहकार व पणन मंत्री, तसेच सह्याद्री सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन बाळासाहेब पाटील यांनी डॉ. आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. याप्रसंगी ते बोलत होते.

यावेळी बोलताना पाटील म्हणाले, स्वातंत्र्यानंतर देशाने लोकशाही मार्ग स्वीकारून प्रगतीचा मार्ग धरला. या प्रवासात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी घडवून दिलेली भारतीय राज्यघटना ही देशाच्या विकासाची भक्कम पायाभूत रचना ठरली आहे. राज्यघटनेमुळेच समाजातील वंचित, दलित, मागास आणि अल्पसंख्यांक घटकांना न्याय मिळवून देण्याचा मार्ग खुला झाला असून, त्यातूनच देशाच्या सर्वांगीण विकासाला गती मिळाली आहे. डॉ. आंबेडकर यांच्या विचारांचा आदर्श समोर ठेवून समाजाने पुढे वाटचाल करणे, हीच त्यांना खरी आदरांजली ठरेल, असे मत त्यांनी व्यक्त केले.

या कार्यक्रमास कराडचे लोकनियुक्त नगराध्यक्ष राजेंद्रसिंह यादव, उपनगराध्यक्ष पोपटराव साळुंखे, लोकशाही आघाडीचे अध्यक्ष तथा नगरसेवक जयंतकाका पाटील, मुख्याधिकारी प्रशांत व्हटकर यांच्यासह नगरपालिकेचे सर्व पदाधिकारी, अधिकारी, कर्मचारी, आजी-माजी नगरसेवक, नगरसेविका, तसेच शहरातील ज्येष्ठ नागरिक, युवक आणि महिला मोठ्या संख्येने उपस्थित होते.


श्री स्वामी समर्थांच्या १४८ व्या पुण्यतिथी निमित्त कोटी कोटी प्रणाम

श्री स्वामी समर्थांच्या दर्शनाकरीता



श्री स्वामी समर्थ



स्वामी सेवक
कै. कल्याणराव शि.इंगळे

अक्कलकोट नगरीत येणार्‍या सर्व स्वामी भक्तांचे हार्दिक स्वागत..

स्वागतोत्सुक



श्री. महेश क.इंगळे
चेअरमन
श्री. वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थान अक्कलकोट
मा. नगराध्यक्ष तथा विद्यमान नगरसेवक

देवस्थानच्या अधिपत्याखालील मंदीरे व देवस्थानच्या वतीने राबविले जाणारे उपक्रम

- ❊श्री.वटवृक्ष मंदिर वातानुकूलीत गाभारा व मंडप
- ❊श्री.वटवृक्ष मंदिरात कै. कल्याणराव इंगळे सभा मंडप
- ❊श्री.विठ्ठल मंदिर
- ❊भक्तांच्या सोईसाठी भक्त निवास
- ❊तंत्र निकेतन विद्यार्थी वस्तीगृह
- ❊बालकांकरीता शिशू विकास मंदिर
- ❊वर्षभरातील सण, उत्सवप्रसंगी प्रसाद वाटप
- ❊श्री.वटवृक्ष मंदिर वातानुकूलीत परिसर
- ❊श्री.मुरलीधर मंदिर येथे नियोजित भक्त निवार व दर्शन रांग
- ❊श्री.राम मंदिर
- ❊रूग्णांच्या सेवेसाठी रूग्णालय
- ❊भक्त निवास येथे गाईची गोशाळा
- ❊तंत्र निकेतन महाविद्यालय

वस्तीगृहातील विद्यार्थी व देवस्थान सेवेकरी यांना दैनंदिन मोफत भोजनप्रसादाची सोय.

मंदिर परिसरातील उत्सव, यात्रा, सामुदायिक विवाह सोहळे यासाठी देवस्थानच्या वतीने धान्य स्वरूपात मदत, तसेच परगांवाहून दिंडी व पालखी सोबत पायी चालत येणार्‍या भक्तांना, तसेच पारायण सप्ताह, हरीनाम सप्ताह, व्रतवैकल्य, होमहवन, दत्तयाग, भजनकरी, वर्षभरातील सण, वटवृक्ष मंदिरात व मंदिराच्या अधिपत्याखाली असलेले मुरलीधर मंदिर, विठ्ठल मंदिर, राम मंदिर, येथे सालाबादाप्रमाणे होणार्‍या उत्सवात सर्व भाविकांना भोजन महाप्रसादाची सोय इत्यादी उपक्रम देवस्थानच्या वतीने राबविले जातात.

आपले नम्र

श्री. महेश क. इंगळे
चेअरमन

श्री. आत्माराम मा. घाटगे
सेक्रेटरी

श्री. वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थान अक्कलकोट
विश्वस्त मंडळ

श्री. म.व्यं. गोगी, श्री.द.सि.हिरेमठ, श्री.सं.न.शिंदे, श्रीमती.उ.क.सरदेशमुख,श्री.वि.रा.दास, श्री.प्र.ग.झपके

ट्रस्ट रजि. नं. ए ८५,
फोन - ०२१८१-२२०३२१, भक्त निवास- ०२१८१-२२१९०९
रूग्णालय-०२१९१-२२२२८१, Email- shrivsmdevasthan@gmail.com
टीप- देणगीदारास ८० जी कलमान्वये आयकरात सवलत आहे.


# धडाकेबाज तपास पण प्यायला पाणी नाही!

## सातारा तालुका पोलीस ठाण्याची विरोधाभासी अवस्था उघड

**सातारा/प्रतिनिधी:–**
गुन्हेगारांवर बहिरी ससाण्यासारखी नजर ठेवणारे आणि धडाकेबाज कारवायांसाठी ओळखले जाणारे सातारा तालुका पोलीस ठाणे सध्या एका वेगळ्याच कारणाने चर्चेत आले आहे-ते म्हणजे पिण्याच्या पाण्याच्या मूलभूत सुविधेचा अभाव.

पोलीस निरीक्षक निलेश तांबे यांच्या नेतृत्वाखाली या ठाण्याने अलीकडच्या काळात अनेक ठळक कारवाया केल्या आहेत. अवैध वाहतुकीवर कारवाई, मनुष्यवधातील फरार आरोपींचा शोध, तसेच तालुक्यातील दुर्गम भागात होणार्‍या रेव पार्टींवर धाड- या सर्वांमुळे ठाण्याची कामगिरी कौतुकास्पद ठरली आहे. गुन्हेगारीवर लगाम घालण्यात ठाण्याने आक्रमक भूमिका घेतली असली, तरी स्वतःच्या आवारातील मूलभूत गरजांकडे मात्र दुर्लक्ष झाल्याचे चित्र दिसते.

ठाण्याची इमारत आणि परिसरातील वृक्षसंपदा यामुळे वातावरण प्रसन्न वाटते; मात्र या हिरवळीच्या आड एक गंभीर समस्या दडलेली आहे. ठाण्यात दोन कुलर यंत्रणा असूनही पिण्याचे पाणी उपलब्ध नाही. नळ कनेक्शन असूनही नियमित पाणीपुरवठा होत नसल्याने अधिकारी, कर्मचारी आणि ठाण्यात येणारे नागरिक यांना बाटलीबंद पाण्यावर अवलंबून राहावे लागत आहे.

विशेषतः उन्हाच्या तीव्रतेत नागरिक, वकील, पक्षकार यांची ठाण्यात मोठी वर्दळ असते. अशा वेळी किमान थंड पिण्याचे पाणी उपलब्ध असावे, ही अपेक्षा रास्त असतानाही प्रत्यक्षात 'जार संस्कृती'वर ठाणे चालत असल्याचे दिसते. कुलर निष्क्रिय आहेत, आणि पाणी संपल्यावर समोरील हॉटेलमधून बाटल्या आणण्याची वेळ येते-ही बाब प्रशासनाच्या नियोजनशून्यतेवर बोट ठेवणारी आहे.

नगरपालिकेच्या वतीने शिवतेज हॉल आणि पोलीस ठाण्याला नळजोडणी दिली गेल्याचे सांगितले जाते; मात्र प्रत्यक्षात पुरवठा का होत नाही, याचे स्पष्ट उत्तर मिळत नाही. ही जबाबदारी नेमकी कोणाची-पालिका की संबंधित यंत्रणा-याचा उलगडा होणे आवश्यक आहे.

गुन्हेगारीवर कठोर कारवाई करणार्‍या यंत्रणेची स्वतःची पायाभूत सुविधा एवढी कमकुवत असणे, हा



एक गंभीर विरोधाभास आहे. धडाकेबाज तपास पण प्यायला पाणी नाही, ही स्थिती केवळ प्रशासनाच्या दुर्लक्षाची नव्हे, तर नागरिकाभिमुख सेवांतील तुटवड्याचीही जाणीव करून देते. सातारा तालुका पोलीस ठाण्यात येणार्‍या प्रत्येक नागरिकाला किमान पिण्याचे स्वच्छ पाणी आणि मूलभूत सुविधा उपलब्ध करून देणे ही प्रशासनाची जबाबदारी आहे. या प्रश्नावर तात्काळ उपाययोजना होणे, हीच सध्या सर्वांची माफक पण रास्त अपेक्षा आहे.

# ओंडोशीत 'शंभर बाल आंबेडकर' अवतरले

## स्मित किरण पब्लिक स्कूलमध्ये विचारांची अनोखी जागर यात्रा ;जयंतीनिमित्त विविध उपक्रम, संविधान व समतेचा संदेश

**कराड/प्रतिनिधी : –**
कराड तालुक्यातील ओंडोशी येथे स्मित किरण पब्लिक स्कूलमध्ये भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त अत्यंत वेगळ्या आणि प्रेरणादायी उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. यावेळी तब्बल शंभरहून अधिक विद्यार्थ्यांनी 'बाल आंबेडकर' बनत सामाजिक जाणीवा जागृत करण्याचा अनोखा संदेश दिला.

कार्यक्रमाची सुरुवात गौतम बुद्ध आणि डॉ. आंबेडकर यांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून झाली. त्यानंतर संविधानाचे सामूहिक वाचन आणि बुद्धवंदना सादर करण्यात आली. शाळेच्या प्रांगणातच विद्यार्थ्यांनी साकारलेले 'बाल आंबेडकर' हे दृश्य उपस्थितांसाठी विशेष आकर्षण ठरले. या अनोख्या उपक्रमातून विद्यार्थ्यांमध्ये समता, बंधुता आणि सामाजिक न्याय





यांचे महत्त्व रुजवण्याचा प्रयत्न करण्यात आला. केवळ औपचारिक मिरवणुका किंवा उत्सव न साजरे करता, महान व्यक्तींचे विचार प्रत्यक्ष जीवनात उतरवणे गरजेचे असल्याचा ठाम संदेश या उपक्रमातून देण्यात आला.

संस्थेच्या सचिव डॉ. अंजली देसाई विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना म्हणाल्या, बोधिसत्व गौतम बुद्ध, छत्रपती शिवाजी महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा ज्योतिबा फुले आणि सावित्रीबाई फुले यांसारख्या थोर विभूतींचे विचार केवळ ऐकण्यापुरते न ठेवता ते अंगीकारणे आवश्यक आहे. सत्य, न्याय आणि समतेचा मार्ग स्वीकारल्यासच समाजात खरा बदल घडू शकतो.

कार्यक्रमानंतर विद्यार्थ्यांची भव्य संविधान जनजागृती रॅली काढण्यात आली. या रॅलीत शंभरहून अधिक 'बाल आंबेडकर' हातात संविधानाची प्रत घेऊन सहभागी झाले होते. विविध भागातून काढण्यात आलेल्या या रॅलीत इतर महान व्यक्तींची वेशभूषा साकारत विद्यार्थ्यांनी समाजप्रबोधनाचा संदेश दिला. या रॅलीला ग्रामस्थ, पालक आणि नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. लहान वयातच विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक जाणीवा जागृत होत असल्याचे पाहून ग्रामस्थांनी समाधान व्यक्त करत विद्यार्थ्यांना खाऊ वाटप केले.

हा उपक्रम यशस्वी करण्यासाठी सचिव डॉ. देसाई यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक संचालक अलका जाधव, प्रभारी अमोल अंबपकर, महेश येडगे, सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमास मान्यवरांसह ग्रामस्थ, पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



### पोवाडे, गीत, नृत्याविष्कार व प्रश्नमंजुषा

ओंडोशीसह ओंड व उंडाळे गावांत विद्यार्थ्यांनी डॉ. आंबेडकरांच्या जीवनावर आधारित पोवाडे सादर करत संविधान, शिक्षण, समता आणि कायद्याचे महत्त्व प्रभावीपणे मांडले. 'शिका, संघटित व्हा, संघर्ष करा' हा मूलमंत्र पोवाडा आणि गीतांच्या माध्यमातून समाजापर्यंत पोहोचवण्यात आला. विशेष म्हणजे विद्यार्थ्यांनी संस्कृत, मराठी, हिंदी आणि इंग्रजीसह तब्बल दहा भाषांमध्ये भाषणे सादर करत आपल्या कौशल्याची झलक दाखवली. प्रबोधनपर गीतांवर नृत्य आणि प्रश्नमंजुषा स्पर्धांमधून विद्यार्थ्यांच्या ज्ञानात भर पडली.

### शिक्षणासोबत संस्कारांचा संगम

'संस्कृत आणि संस्कार' रुजवत शाळेत पहिली ते दहावीपर्यंत संस्कृत विषयाचे शिक्षण देऊन शंभर गुणांची परीक्षा घेतली जाते. तसेच विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी क्रीडा, स्केटिंग, धनुर्विद्या, मिलिटरी ॲडव्हेंचर यांसारख्या उपक्रमांवर विशेष भर दिला जातो. यातून विद्यार्थ्यांचा बौद्धिक विकासाबरोबरच शारीरिक आणि मानसिक सक्षमीकरण साधण्याचा प्रयत्न केला जात असल्याचे डॉ. देसाई यांनी यावेळी नमूद केले.

सीबीएससी पॅटर्नवर आधारित शिक्षण देताना विद्यार्थ्यांना केवळ परीक्षार्थी न बनवता त्यांच्यात मूल्यांची जडणघडण करणे महत्त्वाचे आहे. लहान वयातच आचार-विचार आणि संस्कार रुजवले, तर त्याचा सकारात्मक परिणाम संपूर्ण कुटुंब किंबहुना समाजावर होतो. हा बदल घडवण्याचा खरा राजमार्ग शिक्षणातूनच जातो.

- डॉ. अंजली देसाई
(सचिव, स्मित किरण पब्लिक स्कूल, ओंडोशी)